



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १८८ वा | शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# विमान अपघातामागे कुणाचा हात? ती व्यक्ती कोण?

## रोहित पवारांचा सनसनाटी आरोप

## बारामतीमध्येही एफआयआर दाखल करण्यास पोलिसांचा नकार





**बारामती (कटूसत्य वृत्त):-** अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणात ऊ्क्षअ आणि शरफकंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी आमदार रोहित पवार आक्रमक दिसले. बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यात त्यांनी अधिकायांशी चर्चा केली.

त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी विमान अपघातामागे कुणाचा हात आहे ,यावरून मोठे भाष्य केले. त्यांनी राज्यातील एका मोठ्या नेत्याचा उल्लेख पण केला. व्हीएसआर कंपनीच्या मालकाच्या जवळ अनेक लोक असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांच्या बोलण्याचा नेमका रोख कुणाकडे आहे याची चर्चा आता होत आहे.

**FIR दाखल झाला पाहिजे**

बारामतीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत आमदार रोहित पवार यांनी गुन्हा दाखल करण्याविषयी पुन्हा आग्रही भूमिका मांडली. ते म्हणाले की विमान अपघात हा गुन्हा १०० टक्के दखल पात्र आहे. मग यात गुन्हा का दाखल केला जात नाही. अजितदादांची दखल घेतली जात नाही असं व्यक्तीमत्त्व होतं का. सीआयडी आणि सीबीआयकडून चौकशी करा. आमचं काही म्हणणं नाही. पण एफआयआर दाखल करण्यात आला पाहिजे, अशी मागणी रोहित पवार यांनी केली केली आहे.

कॉज ऑफ ॲक्शन आला आहे. त्या आधारे एफआयआर दाखल झाला पाहिजे. दादांना न्याय का मिळत नाही. एफआयआर का दाखल करत नाही. आम्ही चुकीचा एफआयआर दाखल करत असू तर आमच्यावर कारवाई करा. आम्हाला तुरुंगात टाका. पण ऐकत नाही. कुणाला तरी वाचवलं जात आहे. कुणाचा तरी प्रेशर आहे. पोलीस अशा पद्धतीने वागत असल्याने हा घातपात आहे का हा संशय निर्माण होत आहे, असा गंभीर आरोप रोहित पवार यांनी केला आहे.

**अपघातामागे कुणाचा हात?**

व्हीएसआर कंपनीचे मालक अनेक मोठ्या लोकांच्या जवळचे आहेत. रोहित सिंगच्या लग्नाला महाराष्ट्रातील मोठा नेता गेला होता. आंध्राचा नेता गेला. त्याच्या एनबीएससी कंपनीला रोहित सिंगने मोठा निधी दिला. त्यामुळे त्याला वाचवलं जात आहे असा गंभीर आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजितदादांना खराब विमान दिलं हे डीजीसीए सांगतं. त्यामुळे हे विमान मुद्दाम दिलं का. यामागे मोठ्या व्यक्तीचा हात आहे असा सवाल रोहित पवार यांनी केला. चौकशी अपघतावर होतेय. चौकशी कराच. पण घातपात आहे का, क्रिमिनिल अँगल आहे का याचीही चौकशी करा. ते केलं जात नाही. याचा अर्थ कोणत्या ना कोणत्या मोठ्या व्यक्तीचा या मागे हात आहे. हा संशय आहे, असा मोठा दावा रोहित पवारांनी पत्रकार परिषदेत केला.

तब्बल दोन तास चर्चा केल्यानंतरही एफआयआर दाखल करण्यास पोलिसांनी नकार दिला. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेतून रोहित पवार यांनी गंभीर आरोप केले.

**काय म्हणाले रोहित पवार?**

"दोन दिवसांपूर्वी डीजीसीए एक रिपोर्ट आलेला सर्वांनी पाहिला. हा २४ फेब्रुवारीचा रिपोर्ट आहे. त्या रिपोर्टनंतर काल मी सर्वपक्षीय आमदार मुंबईमधील मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात तिथे गेलो. त्याठिकाणी अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत जो रिपोर्ट दिला आहे. त्यामध्ये व्हीएसआर कंपनीकडून निष्काळजीपणा झाल्याचा थेट आरोप आहे. त्यावरुन संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आम्ही केली होती," असं रोहित पवार यांनी सांगितले.

तसेच "मी मुंबईला एफआयआर करु शकत होतो तो एफआयआर ट्रान्सफर करता आला असता, मात्र तो त्यांनी स्वीकारला नाही. सेक्शन १७३ अंतर्गत या देशातील कोणत्याही नागरिकाला एफआयआर करण्याचा अधिकार आहे. सुप्रीम कोटार्ने ललिता कुमारी प्रकरणात असा निकाल दिला आहे. तुमच्यापैकी कोणीही एफआयआर केला तरी स्विकारला पाहिजे. याआधी ३०-३१ लाही आपण केस करु शकलो असतो, कारण सखोल माहिती येऊ द्या," अशी आमची भूमिका होती.

पुढे बोलताना रोहित पवार सांगितले की, "जर व्हीएसआरची विमाने उडण्यास बंदी घातली आहे तर अजित पवारांना खराब विमान का दिले गेले? ते चुकून दिले गेले की मुद्दाम दिले गेले? अजित पवार यांच्या विमानचे कंडीशन चांगले असल्याचे कोणत्या अधिकाऱ्यांनी सांगितले? याबाबतचा तपास व्हावा, यासाठी आम्ही एफआयआर करत आहोत. ॲरो नावाच्या कंपनीवर एफआयआर करा असं आम्ही सांगितले. विमान उड्डाण घेण्यास योग्य हवामान आहे असं कोणी सांगितले त्यांची चौकशी झाली पाहिजे.

"गेले दोन तास चर्चा केल्यानंतरही असं करता येत नाही, असं पोलिसांचे म्हणणे आहे, कारण अपघाताचा गुन्हा नोंद आहे. दादांचे आत्तापर्यंत अपघात झाला आहे, एवढीच नोंद आहे. मात्र यामागे घातपातचा संशय किंवा गुन्हेगारी कृत्य आहे त्याबाबतच्या तपासाचे काय होणार आहे? त्याबाबत कुठेही गुन्हे घेतले जात नाहीत. कालही अधिकाऱ्यांवर दबाव होता, तसाच दबाव बारामतीमधील पोलिसांवरही जाणवत आहे. इथे १०० वकिलांची फौज आहे, आम्ही आणखी काहीवेळ थांबून निर्णयाची वाट पाहू, असं रोहित पवार म्हणाले.

**एफआयआर का नको आहे?**

एफआयर घेण्यास टाळाटाळ का होत आहे? सुशांत सिंग राजपुतचा मुद्दा किती तापवला गेला. तो तर महाराष्ट्राचाही नव्हता. अजित पवार यांची दखल घेऊ नये असे शासन सांगत आहे का? आम्ही जो एफआयआर दाखल करत आहोत तो चुकीचा असेल तर आमच्यावर गुन्हे दाखल करा, आम्ही जेलमध्ये जायला तयार आहोत, असंही रोहित पवार म्हणाले.

## वीरशैव लिंगायत समाजाचा 15 मार्च रोजी सामुदायिक विवाह सोहळा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वीरशैव लिंगायत समाज सोलापूर यांच्या वतीने सोलापुरात मल्लिकार्जुन नगरातील मल्लिकार्जुन लॉन, अक्कलकोट रोड येथे वीरशैव लिंगायत समाजाचा रविवार दि. 15 मार्च 2026 रोजी सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती श्रीशैल होळळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महागाईच्या काळात विवाह सोहळा अनेक कुटुंबांसाठी आर्थिक दृष्ट्या मोठा ताण ठरतो. अडचणी येतात, ही बाब लक्षात घेऊन समाज हिताच्या दृष्टिकोनातून हा सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येत आहे. या सोहळ्यात धार्मिक विधी, सुशोभित मंडप, वधू वरांसाठी आवश्यक व्यवस्था, अल्पोपहार तसेच मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. 5 मार्च 2026 पर्यंत या विवाह सोहळ्यासाठी इच्छुक वधू-वरांनी आपली नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

समाजातील जास्तीत जास्त कुटूंबांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या मुला मुलींचे विवाह साधेपणाने, पण सन्मानाने पार पाडावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी विकास हिरेमठ 9146166636 , बसवराज अहिरवाडी 9841310116 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस गणेश माळी, बसवण्णा कटारे, विकास हिरेमठ, प्रकाश केसरे, राहुल जत्ती आदी उपस्थित होते.




## दौंड-कलबुर्गी-दौंड विशेष शटल रेल्वे गाडी कायमस्वरूपी सुरू ठेवावी

### प्रवासी सेवा संघाची पत्रकार परिषदेत मागणी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दौंड - कलबुर्गी - दौंड विशेष शटल रेल्वे गाडी 28 फेब्रुवारी 2026 नंतर बंद करण्याचे नियोजन आहे. ही महत्त्वाची रेल्वेगाडी बंद न करता मुदत वाढीसह कायमस्वरूपी सुरू ठेवण्यात यावी. ही गाडी बंद केल्यास सुमारे 30 किलोमीटर भागातील प्रवाशांना याचा फटका बसणार आहे. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेवरही याचा परिणाम होणार आहे. त्यामुळे ही गाडी पूर्ववत सुरू ठेवावी, अशी मागणी प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.



मध्य रेल्वेच्या मुंबई - चेन्नई मेल एक्सप्रेस च्या वेळेत बदल व अनेक रेल्वे स्टेशनचे प्रवासी थांबे रद्द केल्यामुळे ग्रामीण विभागातील प्रवाशांना जिल्हा मुख्यालय असलेले सोलापूर येथे जाण्यासाठी व संध्याकाळी परतीच्या प्रवासासाठी एक ही सोयीची रेल्वे गाडी नसल्याने दौंड - कलबुर्गी - दौंड विशेष शटल रेल्वे गाडी सुरू करण्यात आली. या विशेष रेल्वे गाडीला फेब्रुवारी 2026 अखेरपर्यंत मंजुरी आहे. यामुळे रेल्वे विभागाकडून मार्च 2026 पासून पुढील कालावधीसाठी मुदत वाढीसह कायमस्वरूपी मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मध्य रेल्वेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठविण्यात यावा अशी मागणी यापूर्वीच निवेदनाद्वारे प्रवासी सेवा संघाने रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

या शटल रेल्वे गाडीला मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रतिसाद मिळत आहे. ही रेल्वे सेवा कायमस्वरूपी सुरू ठेवल्यास विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, नोकरदार, अक्कलकोट व गंगापूर येथे जाणाऱ्या भाविकांची गैरसोय दूर होणार आहे. त्याचबरोबर पास धारकांच्या संख्येत मोठी वाढ होऊन रेल्वेच्या महसुलात वाढ होणार आहे, असेही यावेळी संजय पाटील यांनी सांगितले.

या परिसरातील 30 किलोमीटर भागातील लोकांवर ही रेल्वे गाडी बंद केल्यास मोठा परिणाम होणार आहे. रस्ते मार्गावरून जाणे परवडणार नाही तसेच वेळेचा अपव्य होणार आहे. ग्रामीण भागाशी ग्रामीण भागाचा सोलापूरचे संपर्क कमी होण्याची चिंता आहे. यामुळे सर्वांच्या सोयीसाठी ही रेल्वे गाडी कायमस्वरूपी सुरू ठेवावी, असे स्पष्ट केले आहे

या पत्रकार परिषदेस सचिव संजय चौगुले, खजिनदार नंदू दळवी आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# भारतीय शेतीची चिंता

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या प्रारूपानंतर अनेक शेतकरी संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. शेतकर्यांच्या चिंता केवळ सोयाबीन तेल, धान्य किंवा सफरचंदावरील आयात शुल्क सवलतीपुरत्या मर्यादित नाहीत. या चिंता विश्वास, पारदर्शकता आणि भारतीय शेतीच्या भवितव्याशी संबंधित आहेत. सरकारकडून वारंवार आश्वासन दिले जात आहे की, शेती आणि दुग्ध उद्योग संरक्षित राहतील; परंतु कराराच्या मजकुरात अनेक कृषी आणि अन्नपदार्थांवरील शुल्क कमी करण्याची आणि गैरशुल्क अडथळे हटवण्याची तरतूद असल्याचे सांगितले जात असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

याआधी युरोपियन युनियन आणि न्यूझीलंडसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांमुळे स्वस्त आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आणि त्याचा फटका स्थानिक उत्पादकांना बसला. मुक्त व्यापार करारांचा इतिहास पाहिला तर, ते अनेकदा जागतिक व्यापाराच्या विस्तारासाठी महत्त्वाचे साधन ठरले आहेत. जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) स्थापनेनंतर टॅरिफ कमी करणे, बाजारपेठा खुल्या करणे आणि बहुपक्षीय व्यापार व्यवस्था निर्माण करणे हे जागतिक धोरण बनले.

परंतु जागतिक दक्षिणेकडील अनेक देशांचा अनुभव असा आहे की मुक्त व्यापार करारांचा लाभ मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, निर्यातदार आणि प्रगत अर्थव्यवस्था यांना मिळतो, तर लहान शेतकरी, स्थानिक उद्योग आणि असंघटित कामगार वर्गावर त्याचा विपरीत परिणाम होतो. एफएओ आणि यूएनसीटीएच्या अभ्यासानुसार, अनेक विकासशील देशांमध्ये कृषी बाजार खुला केल्यानंतर ग्रामीण उत्पन्नातील असमानता वाढली आणि लहान शेतकर्यांचे स्थिर उत्पन्न घटले. सफरचंद उद्योगाचे उदाहरण विशेष उल्लेखनीय आहे.

हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये सफरचंद हे केवळ पीक नसून संपूर्ण पर्वतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अमेरिकन सफरचंदांवरील आयात शुल्क कमी झाल्यास आणि किमान आयात मूल्य वाढवल्यास हे सफरचंद भारतीय प्रीमियम सफरचंदांच्या किमतीत बाजारात उपलब्ध होतील. परिणामी, भारतीय ग्राहक समान किमतीत अधिक दर्जेदार आयातीत सफरचंदांना पसंती देतील आणि स्थानिक उत्पादकांचा बाजार हिस्सा घटेल. कोल्ड स्टोरेजमध्ये सफरचंद साठवणे तोट्याचे ठरू शकते आणि स्थानिक उद्योग संकटात सापडू शकतो.

सोयाबीन आणि धान्याच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. भारतात सोयाबीन उत्पादन प्रामुख्याने लहान आणि सीमांत शेतकर्यांद्वारे होते. एक एकर जमिनीत साधारणतः 1 मेट्रिक टन सोयाबीन उत्पादन होते, तर अमेरिकेत जीएम सोयाबीनच्या माध्यमातून 3 मेट्रिक टनपर्यंत उत्पादन होते. ही उत्पादकतेची दरी भारतीय शेतकऱ्यांसाठी असमान स्पर्धा निर्माण करते.

त्यातच अमेरिकन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सरकारी सबसिडी मिळते. अमेरिकन शेतकऱ्यांना दरवर्षी सरासरी 66 हजार डॉलर इतकी सबसिडी मिळते आणि 2026 साठी 12 अब्ज डॉलरचा विशेष सहाय्य कार्यक्रम प्रस्तावित आहे. याच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांना मिळणारी मदत मर्यादित आहे आणि अनेकदा एमएसपीपेक्षा 30 ते 40 टक्के कमी दरात उत्पादन विकावे लागते. अशा परिस्थितीत मुक्त व्यापार म्हणजे असमान मैदानावर खेळण्यासारखे आहे.

हा करार केवळ आर्थिक नसून राजकीयही आहे.

अमेरिकेत मध्यावधी निवडणुका जवळ आल्या आहेत आणि कृषी क्षेत्र हा अमेरिकन राजकारणातील प्रभावी घटक आहे. चीनसोबतच्या व्यापार युद्धामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले आणि निर्यात बाजार घटला. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाला नवीन बाजारपेठांची गरज आहे. भारत हा 140 कोटी लोकसंख्येचा विशाल बाजार असल्यामुळे अमेरिकेसाठी अत्यंत आकर्षक आहे. त्यामुळे भारताशी व्यापार करार हा अमेरिकन राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. ग्रामीण अमेरिकेतील असंतोष कमी करणे आणि शेतकरी लॉबीला संतुष्ट करणे हे ट्रम्प प्रशासनासाठी राजकीयदृष्ट्या आवश्यक आहे.

या कराराचा सर्वात गंभीर पैलू म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. शेतकरी संघटना, विरोधी पक्ष आणि काही राज्य सरकारांनी कराराचा संपूर्ण तपशील संसदेसमोर सादर करण्याची मागणी केली आहे. व्यापार करारांचा परिणाम देशांतर्गत कायद्यांइतकाच गंभीर असतो. कारण, ते लाखो लोकांच्या उपजीविकेवर परिणाम करतात. त्यामुळे संसदीय चर्चा, सार्वजनिक सल्लामसलत आणि प्रभाव मूल्यांकन आवश्यक आहे. लोकशाही प्रक्रियेशिवाय मोठ्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी केल्यास लोकांचा विश्वास ढासळतो आणि सामाजिक असंतोष वाढतो.

भारतीय शेती आधीच अनेक संकटांशी झुंज देत आहे. कर्जबाजारीपणा, हवामान बदल, वाढते उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. आर्थिक सहयोग व विकास संघटना ओईसीडीच्या अहवालानुसार 2000 ते 2025 या कालावधीत भारतीय शेतकर्यांना 111 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत स्वस्त आयातीत उत्पादनांची लाट आली तर स्थानिक बाजार कोसळण्याची शक्यता आहे.

कापूस आयातीवरील शुल्क कमी केल्यानंतर देशांतर्गत किमती घसरल्याचे उदाहरण आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. अन्नपदार्थांची आयात म्हणजे ग्रामीण रोजगाराची घट आणि बेरोजगारीत वाढ, असे अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. भारतासाठी शेती हा केवळ आर्थिक उत्पादनाचे क्षेत्र नाही, तर तो ग्रामीण रोजगाराचा मुख्य स्रोत, सामाजिक स्थैयार्चा आधारस्तंभ आणि अन्नसुरक्षेचा कणा आहे.

भारतात सुमारे 45 टक्क्यांहून अधिक लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भारतात शेती आणि संबंधित क्षेत्रे मिळून सुमारे 18 टक्के योगदान देतात; परंतु रोजगारातील वाटा याहून अधिक आहे. त्यामुळे शेतीवर परिणाम करणारा कोणताही व्यापार करार हा केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय निर्णय ठरतो.

भारतीय आणि अमेरिकन शेतकऱ्यांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे अनुदान आणि पायाभूत सुविधा. अमेरिकेत कृषी उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर सरकारी सहाय्य दिले जाते. कृषी संसाधन व्यवस्थापन सर्वेक्षण 2020 नुसार, एका अमेरिकन शेतकर्याला सरासरी 66,314 डॉलर वार्षिक अनुदान मिळते. याशिवाय, अमेरिकन प्रशासनाने 2026 मध्ये 12 अब्ज डॉलरचे अतिरिक्त सहाय्य जाहीर केले आहे. यामुळे अमेरिकन शेतकरी बाजारातील चढ-उतारांपासून संरक्षण मिळवतात आणि कमी किमतीतही उत्पादन विकू शकतात.

याउलट, भारतीय शेतकऱ्यांना मर्यादित अनुदान, अपुरी सिंचन सुविधा, कमकुवत साठवणूक व्यवस्था आणि बाजारातील अस्थिरता यांचा सामना करावा लागतो. भारतातील लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न इतर देशांच्या शेतकर्यांच्या तुलनेत 10 ते 15 पट कमी आहे. किमान आधारभाव (एमएसपी) अनेकदा बाजारात प्रत्यक्षात मिळत नाही आणि अनेक पिकांसाठी एमएसपीपेक्षा 30 ते 40 टक्के कमी दर मिळतो. अशा परिस्थितीत अनुदानित अमेरिकन उत्पादनांशी स्पर्धा करणे भारतीय शेतकर्यांसाठी अत्यंत अवघड आहे.

या करारामुळे जीएम पिकांचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. अमेरिकन शेती मोठ्या प्रमाणावर जीएम पिकांवर आधारित आहे. भारतात जीएम पिकांबाबत सामाजिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक चिंता आहेत. मुक्त व्यापारामुळे जीएम अन्नपदार्थांचा प्रवेश सुलभ झाल्यास अन्न सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण होतो. अन्न सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतःच्या अन्न प्रणालीवर नियंत्रण असणे.

जर भारताचा अन्न बाजार बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विदेशी उत्पादकांच्या ताब्यात गेला, तर देशाची अन्न सुरक्षा आणि ग्रामीण स्वायत्तता धोक्यात येईल. जागतिक पातळीवर हा करार नव्या व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून पाहिला जात आहे. ट्रम्प प्रशासनाचा व्यापार धोरणांचा कल दबाव आणि शक्तीच्या वापरावर आधारित आहे.

# मराठी भाषा गौरव दिन

## मायबोलीत बोलू या!

## चला... मराठीतच बोलू या!!




मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढवलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे. मातृभाषा आपले अस्तित्व असते. बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे.

हा दिवस प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा आहे.

**मराठी भाषा गौरव दिन : 27 फेब्रुवारी**

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच 27 फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

21 जानेवारी 2013 रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली. तसेच 3 ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. तर दरवर्षी दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त 15 ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, वाचन उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा**

महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे... तुम्हाला माहिती आहे, श्री. चक्रधर स्वामींनी ही गोष्ट आठशे वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.

वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.

जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे.

उदाहरणार्थ, वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' मध्ये वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे. तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो. आचार्य प्र.के.अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात, तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदाहरणार्थ, कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे, तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहे—स्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास**

उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

शासन प्रयत्नशील आहेच; परंतु सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही, तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या!**

'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असते—विशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली.

महाराष्ट्रात येणारा कोणताही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवतो आणि सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे.

त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकवण्यासाठी आम्ही सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी..

- मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार
- मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे
- आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे
- दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर

ही अत्यावश्यक पावले आहेत.

दिवंगत कवीवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे—

मराठीची प्रतिभा,
ज्ञानेश्वरीत समावते
ग्रामगीता गाथाही,
मराठीतच मावते
लावणीतून मराठीचे,
सौंदर्य ओसंडते
शौर्य आणि औदार्य,
पोवाड्यातून सांडते
मराठीनेच तुकड्याला
तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच
जन्म घेऊन गेले
अमृताशी पैज जिंकते,
मराठी बोली
आभाळाची उंची जिच्यात,
समुद्राची खोली
साऱ्यांनी मराठी
हुंकारावर डोलावे
मराठी माणसाने मराठी
माणसाशी मराठीतच बोलावे..!

चला... मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!

**- प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर, 9702858777

# मूलभूत सुविधांबाबत तातडीच्या उपाययोजनांचे महापौरांचे निर्देश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय क्रमांक १ ते ८ च्या कामकाजाचा सविस्तर आढावा बैठक महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका अकोलवार, कार्यकारी अभियंता (सार्वजनिक आरोग्य) वेंकटेश चौबे, कार्यकारी अभियंता (विद्युत) राजेश परदेशी, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, नगरसेवक भारतसिंग बडूरवाले तसेच विभागीय अधिकारी उपस्थित होते. शहरातील विविध मूलभूत सुविधांबाबत नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा यावेळी सखोल आढावा घेण्यात आला.

बैठकीत विशेषतः रस्ते दुरुस्तीच्या प्रलंबित कामांबाबत चर्चा करण्यात आली. अनेक भागांत खड्ड्यांची समस्या आहे ते दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे निर्देश महापौरांनी दिले. तसेच काही भागांत घंटागाडी नियमित जात नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत असून कचरा संकलन व्यवस्था सुरळीत व वेळेवर ठेवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.शहरातील काही भागांत वेळेवर पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारींचीही दखल घेण्यात आली. पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून निश्चित वेळापत्रकानुसार पाणी देण्यात यावे, गळती दुरुस्तीची कामे तात्काळ पूर्ण करावीत आणि अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करावी, असे निर्देश देण्यात आले.याशिवाय ड्रेनेज लाईन तुंबणे, स्ट्रीट लाईट बंद असणे, मोकाट जनावरांचा त्रास, पथदिव्यांची देखभाल, उद्यानांची स्वच्छता, नालेसफाई, डास निर्मूलन फवारणी, तसेच सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता आदी मुद्द्यांवरही चर्चा झाली. नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, असे महापौरांनी स्पष्ट केले.

विभागीय अधिकाऱ्यांनी कामकाज प्रभावीपणे राबविण्यासाठी डंपर, जेसीबी, जटींग मशीन तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन महापौरांनी दिले.नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ प्रतिसाद देऊन समन्वयाने काम करावे व शहरातील सेवा अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि जबाबदारीने पुरवाव्यात, असे आवाहन महापौर विनायक कोंड्याल यांनी यावेळी केले.

# माढ्यात यशवंत फाउंडेशनकडून वह्या, चरित्रपर पुस्तकांचे वाटप



**माढा (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त माढ्यातील यशवंत फाउंडेशनने शहरातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य व वह्यांचे वाटप केले. शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा, मुलांची शाळा क्रमांक दोन व उर्दू शाळा या शाळांमध्ये यशवंत फाउंडेशनने शैक्षणिक साहित्य व वह्यांचे वाटप केले. महापुरुषांच्या चरित्राची शंभर पुस्तके भेट म्हणून दिली. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष देविदास खरात, संतोष जुगदार, सहायक पोलिस निरीक्षक रोहित शिंदे, संभाजी ब्रिगेड प्रदेश कार्यकारिणी सदस्य दिनेश जगदाळे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक सुरेश माळी यांनी केले. वह्यांचे वाटपप्रसंगी देविदास खरात, डॉ. यू. एफ. जानराव, गणेश मोरे, बापू राऊत, दत्तात्रय राऊत, शिवाजी माने, किरण पवार, रवी सरवदे, उपस्थित होते.

# आता 'फिडेल'च्या सेवा विस्तार साठी मोठ्या प्रमाणात नवीन संधी - सुनील कुलकर्णी




**पुणे (कटूसत्य वृत्त):-** 'फिडेल सॉफ्टटेक लि.' या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित कंपनीने जपान मधील 'आयएम कॉर्पोरेशन' या तंत्रज्ञान सल्लागार व सॉफ्टवेअर सेवा देणाऱ्या कंपनीत ८३ टक्के हिस्सा संपादित केला आहे. यामुळे पुढील काळात 'फिडेल' च्या सेवा, वितरण क्षमतेला मोठी चालना मिळणार असून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सेवा विस्तार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नवीन संधी उपलब्ध होणार आहेत अशी माहिती 'फिडेल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कुलकर्णी यांनी पुणे येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आयएम कॉर्पोरेशनचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी रेन्या किकुची, फिडेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्राची कुलकर्णी, मंदार इनामदार, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी सुश्रुत पोतदार, आयएमचे विक्री विभाग प्रमुख नागता योशीयाशु, सिस्टीम विभाग प्रमुख ताकाशी सातो, पीसीईटीचे कार्यकारी अधिकारी डॉ. गिरीश देसाई, फिडेलचे व्यवस्थापन सल्लागार अनिल पटवर्धन, डॉ. दीपक शिकारपूर, आयएमएचे ग्लोबल बोर्ड माजी अध्यक्ष सुनील देशमुख आदी उपस्थित होते.

सुनील कुलकर्णी यांनी सांगितले की, फिडेल सॉफ्टटेक ही तीन दशकांहून अधिक अनुभव असलेल्या जपान येथील मराठी उद्योजकाची कंपनी आहे. जपान आणि भारत यामध्ये उच्च दर्जाचे तंत्रज्ञान, बायलिंग्वल कन्सल्टिंग आणि भाषा अभियांत्रिकी क्षेत्रात २५ वर्षांपासून कार्यरत आहेत. या भागीदारीमुळे जपानी उद्योगांच्या गरजांनुसार तयार केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेवा, उद्योग उपाययोजना अंमलबजावणी, द्विभाषिक सल्ला, व्यवस्थापित सेवा आणि भाषा स्थानिकीकरण या क्षेत्रांमध्ये 'फिडेल'च्या क्षमतेमध्ये मोठी वाढ होईल. स्थानिक प्रकल्प व्यवस्थापन कौशल्य आणि जागतिक तंत्रज्ञान क्षमते द्वारे नावीन्यपूर्ण परिणाम देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

आयएम कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आणि सीइओ रेन्या किकुची यांनी सांगितले की, सुनील कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली आता फिडेल सॉफ्टटेक आणि आयएम कॉर्पोरेशनच्या सेवा आणखी उच्च दर्जाने देता येईल. गेल्या तीन वर्षात आयएम ने डिलिव्हरी उत्पादकता आणि ज्ञान पुनर्वापर सुधारण्यासाठी त्यांच्या मालकीच्या न्युरल नॉलेज फ्रेमवर्कचा वापर करून मॉडेल्स विकसित केले आहेत. १५० पेक्षा अधिक कुशल व्यवसायिकांच्या टीमसह उच्च गुणवत्ता आणि तंत्रज्ञान सेवा देण्यासाठी आम्ही एकत्रितपणे सज्ज झालो आहोत.

पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असणारा एक मराठी उद्योजक जपान मध्ये जाऊन आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण करतो आणि अल्पावधीतच आयएम सारख्या कंपनीचा मोठा हिस्सा संपादित करतो ही बाब सर्व भारतीय उद्योजकांना तसेच स्टार्टअप सुरू करणारे उद्योजकांना प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. आयएम कॉर्पोरेशन आणि त्यांच्या परंपरागत ग्राहकांनी फिडेल सॉफ्टटेक वर दाखवलेला विश्वास सुनील कुलकर्णी आणि त्यांचे टीम सार्थ ठरवेल.

अनिल पटवर्धन म्हणाले की, फिडेल सॉफ्टटेक जून २०२२ मध्ये सूचीबद्ध झाली आहे. तेव्हापासून सातत्याने महसूल वाढ नोंदवली आहे.

डॉ. दीपक शिकारपूर यांनी सांगितले की, या कंपनीचा विकास मार्ग तिच्या भागधारकांसाठी मजबूत मूल्य निर्माण करेल आणि गुंतवणूकदारांना उत्साहवर्धक करता येईल असा विश्वास आहे.

सुनील देशमुख म्हणाले की, आयएम आणि फिडेल एकत्रितपणे नवीन कौशल्यासह ग्राहकांना उत्तम सेवा देऊन आणि भागधारकांना वाढीच्या संधी उपलब्ध करून देतील.

अधिक माहितीसाठी
www.fidelsofttech.com
किंवा sales@fidelsoftech.com
येथे संपर्क साधा.

## मराठी अस्मितेचा



अभिमान अस्मितेचा...
वारसा हिंदुत्वाचा...
पाऊले खुणावती
बहरुन जाती दाही दिशा...
दरि खो-यात खेळते
यशाची रागीणी,
विदेशातुनही आज ऐकतो माझा
मराठीची वाणी...
सह्याद्री हि बोलतो,
लाल किल्ल्यावर भगवा फडकतो,
परंपरेची समृध्दी
वारक-यांची विठाई...
राष्ट्रप्रेरीतांची हि भुमी...
पुण्य कर्मांची ति स्वामी...
स्वाभीमानाचा देश झाला स्वातंत्र,
जिथे ज्ञानराजा नांदतो माझा सुपात्र,
माय मराठीची हि धरती,
तुकोबांच्या वैकुंठांची किर्ती...
पुंडलीक राहतो भिमा तीरी,
नामदेव राहतो पायरीवरी...
भाग्य आम्हांस लाभले
जिजाऊंची मुर्ती,
स्वराज्य स्थापनेस
छत्रपती शिवाजी महाराजांची
इच्छा शक्ती...
विजयशील मावळ्यांची
एकनिष्ठ कृती...
युवराज अजिंक्य शंभु राजा
महाराष्ट्राचे लेण भुषविती,
अभिजात मराठीचा...
बाळगतो अभिमान...
माझा कोटी-कोटी प्रणाम...
मी मराठीचा स्वाभिमान.

**मयुरी विश्वनाथ बाबर**
9112443334

## वात्रटिका

### तडाखा अवकाळीचा

शेतकऱ्यांच्या नशिबात सदाच
फाल्गुन महिना नि होळी आहे...
जोमात आले पिक वाटते तेव्हा
गारपीट आणि अवकाळी आहे...
पहावणार नाही सरकारला,
वराती मागून घोडे येतील...
आश्वासनाची खैरात नि उदार
राजासारखी मदत करतील...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# 'शिवरायांचा आदर्श विसरलात का ?' सुदर्शन तारख यांचा सत्ताधाऱ्यांना जाब

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य शिवजन्मोत्सव सोहळ्यात व्याख्याते शिवश्री सुदर्शन तारख (इतिहास अभ्यासक) यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य संकल्पनेचा परखड वेध घेत आजच्या राज्यकर्त्यांना थेट सवाल केला – 'शिवरायांचा आदर्श आपण खरोखर जपतो आहोत का?' स्वराज्य, स्त्रीसुरक्षा, समानता आणि जबाबदार लोकशाही यांचा संदर्भ देत त्यांनी सध्याच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. त्यांच्या रोखठोक आणि अभ्यासपूर्ण भाषणामुळे उपस्थितांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

हा कार्यक्रम टेंभुर्णी येथील करमाळा चौक येथे, दि. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८.०० वाजता, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रांगण, करमाळा चौक, टेंभुर्णी (ता. माढा) येथे उत्साहात पार पडला.

'छत्रपती शिवरायांचे स्वराज्य आणि आजचे राजकारण' या विषयावर बोलताना तारख यांनी सांगितले की, शिवाजी महाराज हे केवळ युद्धनीतीत पारंगत नव्हते, तर लोकाभिमुख, न्यायप्रिय आणि सर्वसमावेशक राज्यकारभार करणारे राजे होते. राजा हा प्रजेचा पालक असतो, ही भूमिका त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केली. महिलांच्या सन्मानाचे रक्षण, प्रशासनातील पारदर्शकता आणि जनतेशी थेट संवाद ही शिवराज्याची वैशिष्ट्ये होती, असे त्यांनी नमूद केले.

तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानातील समानतेच्या तत्त्वांची आठवण करून दिली. 'संविधानाने प्रत्येकाला समान



हक्क दिला आहे; मात्र पैशासाठी मतदान करणे ही प्रवृत्ती लोकशाहीला मारक आहे. हे संविधानकर्त्यांना अपेक्षित नव्हते,' असे ते म्हणाले.

समाजात वाढत चाललेली जातीय व धार्मिक दुरावा दूर करण्याचे आवाहन करत त्यांनी स्पष्ट केले, 'हिंदू-मुस्लिम, मराठा-दलित असे विभाजन नको; आपण सर्वप्रथम भारतीय आहोत, ही भावना बळकट झाली पाहिजे. शिवरायांचे खरे स्मरण म्हणजे त्यांच्या विचारांचे आचरण.'

कार्यक्रमाच्या शेवटी 'जय जिजाऊ, जय शिवराय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमला. उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात व्याख्यात्यांना प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती संजय कोकाटे (संपर्कप्रमुख शिंदे सेना), माजी कृषी सभापती संजय पाटील (माजी सभापती जि.प.), पोपट अनपट (पं. सं. सदस्य), रावसाहेब देशमुख (तिसऱ्या गाडीची नेते), ऋषिकेश बोबडे (ग्रां.पं. सदस्य), तात्यासाहेब पाटील (माजी जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ), सुहास पाटील (अध्यक्ष रयत क्रांती), औदुंबर महाडिक (चेअरमन डी.व्ही.पी.) प्रहार चे अमोल जगदाळे, सुरज ढवळे (युवा नेते) मयूर काळे, यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रास्ताविक सचिन जगताप (अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र संभाजी ब्रिगेड) यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन खुळे (जिल्हाध्यक्ष) यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगेश मुळे, पपेश पाटील, अजय गायकवाड, विजय काळे, नागेश खरसांडे, अविनाश नांगरे, ज्योतीराम बागवाले, रामभाऊ मिटकल, दादा भोसले, अश्विन पाटील, दादा मुळे, संदेश बागल, तुकाराम भोसले, शंकर नागणे, शंकर उबाळे व नागनाथ महाडीक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महापुरानंतर पाणीपट्टीचा तगादा; शेतकरी संकटात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** मागील सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यातील अतिवृष्टी व सीना नदीला आलेल्या महापुरामुळे शेतकऱ्यांची पिके वाहून गेली असतानाच पाटबंधारे विभागाने थकीत पाणीपट्टी भरण्याबाबत नोटिसा बजावल्याने शेतकऱ्यांत नाराजी पसरली आहे. थकीत रक्कम न भरल्यास कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीवरील वडकबाळ, सिंदखेड, बंदलगी (ता. दक्षिण सोलापूर) व कोसेगाव (ता. अक्कलकोट) येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमधून सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणीउपसा केला जातो. या योजनांतील पाणीपरवाना धारकांना ५ मार्चपर्यंत पाणीपरवाना नुतनीकरण करण्याचे व थकीत पाणीपट्टी भरण्याचे आदेश नोटिसीद्वारे देण्यात आले आहेत. अनेक परवान्यांची मुदत संपलेली असून उर्वरित परवाने ३१ मार्च २०२६ रोजी संपणार असल्याचे नोटिसीत नमूद आहे.

विहित नमुन्यातील 'नमुना ७-अ' पाणी मागणी अर्ज सादर करणे, पाणीपट्टी वेळेत भरणे आणि परवाना नुतनीकरण करणे ही धारकांची वैयक्तिक जबाबदारी असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. परवाना घेताना शासनाच्या नियम-अटी मान्य केल्याची लेखी संमती दिलेली असल्याने स्वतंत्र पूर्वसूचना देण्याची गरज नाही, असेही नोटिसीत नमूद करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांची अडचण काय?

खरीप हंगामातील पिके महापुरात वाहून गेल्याने उत्पन्नच हाती आले नाही. रब्बी हंगामातील पेरणीही उशिरा झाली. सीना नदीकाठी काही गावांमध्ये महापुरानंतर डिसेंबरमध्येच वीजजोडणी सुरळीत झाली. परिणामी रब्बी पेरणी उशिरा झाली किंवा काही ठिकाणी वाफसा न आल्याने पेरणीच होऊ शकली नाही. उसासह इतर पिकांचे मोठे नुकसान झाल्याने 'पैसे भरायचे कुठून?' असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.

**कारवाईचा इशारा**

थकीत पाणीपट्टी न भरल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता पाणीपरवाना रद्द करणे, दंडात्मक आकारणी, पंपाचे विद्युत कनेक्शन बंद करणे, सातबारा उताऱ्यावर बोजा नोंदविणे यासह प्रचलित नियमांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पाटबंधारे शाखा सीना व सोलापूरचे शाखाधिकारी क्र. बा. वडेर यांनी दिला आहे.

**नुतनीकरणासाठी आवश्यक कागदपत्रे**

- आधार कार्ड
- चालू ७/१२ उतारा
- ८-अ उतारा
- पाणीपरवाना मूळ प्रत
- चालू विद्युत पंपाचे मासिक देयक
- इतर आवश्यक कागदपत्रे

सदर कागदपत्रांसह शाखाधिकारी, पाटबंधारे शाखा सीना-ब, किनारा हॉटेलसमोर, आयकर भवनमागे, होटगी रोड, सोलापूर येथे अर्ज सादर करावा लागणार आहे.

महापुरानंतर आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता पाणीपट्टी भरण्याचे नवे आव्हान उभे ठाकले असून प्रशासनाने सवलत किंवा मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# नवी मुंबईत 'हिंद दी चादर' कार्यक्रमासाठी सोलापूर प्रशासनाची आढावा बैठक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नवी मुंबई येथे दि. 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2026 रोजी होणाऱ्या हिंद दी चादर श्री श्री गुरू तेग बहादूर साहिब जी 350 वी शहिदी समागम या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने नियोजन भवन येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक आ. धर्मगुरू बाबुसिंग महाराज (विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य तथा अशासकीय सदस्य, राज्यस्तरीय समन्वय समिती) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



बैठकीत बोलताना आ. धर्मगुरू बाबुसिंग महाराज यांनी सांगितले की, श्री गुरू तेग बहादूर साहिब यांचे कार्य महान असून त्यांनी समाजातील सर्व जाती-धर्मांना समानतेची शिकवण दिली आहे. या कार्यक्रमासाठी समाजातील लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मुंबईला जाणाऱ्या भाविकांसाठी शासनाने रेल्वेची सोय करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कासेकर यांनी शासनाकडून योग्य नियोजन करून कार्यक्रमाला जाणाऱ्या लोकांसाठी समन्वयक नेमून सर्वतोपरी मदत करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

बैठकीस उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कासेकर, बंजारा समाजाचे आ. धर्मगुरू बाबुसिंग महाराज, अशासकीय सदस्य आशोक चव्हाण, जेष्ठ मार्गदर्शक सदाशिव चव्हाण, वसंतराव नाईक, बंडू महाराज (दापकेकर), तसेच क्षेत्रीय आयोजन समिती व संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजना अशासकीय सदस्य श्रीमंतराजे चव्हाण, मोतीराम राठोड, युवराज राठोड, विजय राठोड, नाम पवार, सोमनाथ राठोड इत्यादी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

# आयुष्मान वय वंदना कार्ड तयार करण्यासाठी जिल्ह्यात विशेष मोहीम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत 70 वर्ष व त्यावरील नागरिकांचे "आयुष्मान वय वंदना कार्ड" तयार करण्यासाठी ग्रामीण भागात गावनिहाय आणि शहरी भागात वॉर्डनिहाय विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यात सध्या 70 वर्ष व त्यावरील लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या प्रक्रियेसाठी आशा स्वयंसेविका, स्वस्त धान्य दुकानदार, आपले सरकार सेवा केंद्र कर्मचारी यांना प्रति यशस्वी ई-केवायसीसाठी 20 रुपये आणि आयुष्मान कार्ड वितरणासाठी 10 रुपये, असे एकूण 30 रुपये मानधन देण्याचा शासन निर्णयही घेण्यात आला आहे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. तसेच 70 वर्ष व त्यावरील नागरिकांना "आयुष्मान वय वंदना कार्ड" द्वारे प्रति लाभार्थी प्रति वर्ष 5 लाख रुपयांपर्यंत 2399 आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करता येणार आहेत.

यासाठी जिल्ह्यातील 91 खाजगी आणि 22 शासकीय अशा एकूण 113 रुग्णालयांमध्ये तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड ग्रामपंचायत स्तरावर आपले सरकार सेवा केंद्र, csc केंद्र, रेशन दुकानदार, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून मोफत काढून देण्यात येणार आहे. 70 वर्ष व त्यावरील सर्व जेष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा आणि आयुष्मान वय वंदना कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी आणि मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

ही विशेष मोहीम दिनांक 20 फेब्रुवारी 2026 ते 13 मार्च 2026 या कालावधीत राबविण्यात येणार असून, संबंधित कर्मचारी गाव, वॉर्ड, वाडी, वस्ती, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण करणार आहेत. तसेच लाभार्थ्यांना स्वतःचे ई-केवायसी स्वतः करता यावे यासाठी अँड्रॉईड मोबाईलवर आयुष्मान ॲप डाउनलोड करून Beneficiary Login द्वारे किंवा Operator Login मधील "For Senior Citizens of the age of Seventy years & Above Click Here to Enroll" या पर्यायाद्वारे आयुष्मान वय वंदना कार्ड तयार करता येणार आहे.

मा. जिल्हाधिकारी आणि मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गावनिहाय नियोजन करण्यात आले असून, सर्व विभागांच्या समन्वयातून मार्च 2026 अखेरपर्यंत जिल्ह्यातील 70 वर्ष व त्यावरील सर्व पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान वय वंदना कार्ड ई-केवायसी 100 टक्के पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. अशी माहिती शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सोलापूर तथा सदस्य सचिव जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती, म.ज्यो.फु.ज.आ.यो. डॉ. वर्षा डोईफोडे यांनी दिली आहे

# 2 मार्च रोजी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासन परिपत्रकानुसार जिल्हा लोकशाही दिन महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. जिल्हा लोकशाही दिन सोमवार दि.02 मार्च 2026 रोजी होणार असून त्या दिवशी जनतेच्या तक्रारी- गाऱ्हाणी ऐकण्याकरीता त्या त्या विभागातील विभाग प्रमुखांनी उपस्थित राहण्याचे निर्देश शासन परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. तरी माहे मार्च 2026 चा जिल्हा लोकशाही दिन दि.02 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात आला असून सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी आपले कडील मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाचे निवेदनावर केलेली कारवाईचा अहवालासह सकाळी 10.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सात रस्ता येथे उपस्थित रहावे. या दिवशी गैरहजर राहणार असल्यास त्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी कळवले आहे.

**जाहीर नोटीस** जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३६/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. शमशोद्दीन फजलेरहेमान कुरेशी रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापूर (असल्यास, तर्फे वकीलरियाज द बागवान) } अर्जदार

**विरूद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. काटेगाव } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०४ एप्रिल १९६५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०४ एप्रिल १९६५ रोजी मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

लिपीक (शिक्का) (एफ. आर. शेख) तहसिलदार बार्शी

**जाहीर नोटीस** जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. २७/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. सफीया उर्फ सुफीयाबानु जलाल शेख रा. मुजावर गल्ली पंराडा ता. परांडा (असल्यास, तर्फे वकीलरियाज द शेख) } अर्जदार

**विरूद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न. प. बार्शी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. मुजावर गल्ली पंराडा ता. परांडा यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक १९ एप्रिल १९७६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १९ एप्रिल १९७६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

लिपीक (शिक्का) (एफ. आर. शेख) तहसिलदार बार्शी

**चौकशीची जाहीर नोटीस**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**

**ब.अ.नं.१३/२०२६**

**कि.क.अ.क्र. १४/२०२६**

सार्वजनिक न्यासाचे नांवः- सन-मून एज्यूकेशनल सोशल वेल्फेअर ट्रस्ट, सोलापूर प्लॉट नं.१६, नागेंद्र नगर, मजरेवाडी, सोलापूर नोंदणी क्र. एफ ३३३७६/ सोलापूर

अर्जदार-श्री. शब्बीर मोहीद्दीन शेखरा. २८, मार्कंडेय नगर, कुमठा नाका, सोलापूर

सर्व संबंधीत लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, सोलापूर विभाग सोलापूर हे वर नमूद केलेल्या अर्जात संस्थेच्या घटनेतील उद्देशा मध्ये दुरूस्ती करण्यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत. सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त, सोलापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक :-२६/२/२६ रोजी दिली,

(शिक्का) **अधिक्षक सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**

**जाहीर नोटीस** जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १३५/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. सुदाम किसन शेरखाने रा. राळेरास ता. बार्शी लिन. सोलापूर (असल्यास, तर्फे वकीलडि. एस. मुढें) } अर्जदार

**विरूद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. राळेरास } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. राळेरास ता. बार्शी लिन. सोलापूर यांचा मौजे राळेरास ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ मे १९५८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ मे १९५८ रोजी मौजे राळेरास ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाची कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

लिपीक (शिक्का) (एफ. आर. शेख) तहसिलदार बार्शी

**जाहीर नोटीस** जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३५/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. कमरुद्दीन फजलेरहेमान कुरेशी रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापूर (असल्यास, तर्फे वकील) } अर्जदार

**विरूद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. काटेगाव } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०४ एप्रिल १९६५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०४ एप्रिल १९६५ रोजी मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

लिपीक (शिक्का) (एफ. आर. शेख) तहसिलदार बार्शी

**जाहीर नोटीस** जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ६५/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. शौकत युसूफ सौदागर रा. श्रीराम पेठ पांगरी (असल्यास, तर्फे वकीलरियाज द बागवान) } अर्जदार

**विरूद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. पांगरी } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. श्रीराम पेठ पांगरी यांचा मौजे पांगरी ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ जुन १९७९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९७९ रोजी मौजे पांगरी ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

लिपीक (शिक्का) (एफ. आर. शेख) तहसिलदार बार्शी

**जाहीर नोटीस** जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३७/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. शबाना कमालुददीन सौदागर रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापूर (असल्यास, तर्फे वकीलरियाज द बागवान) } अर्जदार

**विरूद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. काटेगाव } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०१ जुन १९७१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९७१ रोजी मौजे काटेगाव ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

लिपीक (शिक्का) (एफ. आर. शेख) तहसिलदार बार्शी

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

## सुडोकु - 188

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | | 8 | | 2 |
| 7 | | | 4 | 2 | 8 | | 9 | 6 |
| 2 | 1 | | | 3 | | 7 | | 5 |
| | 3 | 1 | | | | 9 | 8 | |
| | | | 1 | | | | | 7 |
| 8 | 2 | | 9 | 5 | | | | 3 |
| 3 | | | | | 2 | | 6 | |
| | 8 | 5 | | 7 | 6 | | | |
| 9 | | 2 | 5 | | 1 | 3 | | 8 |

# स्थायी समिती चेअरमनपदासाठी पुढील महिन्यात निवडणूक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** महापौर, उपमहापौर आणि सभागृहनेता निवडीनंतर आता सोलापूर महानगरपालिकामध्ये स्थायी समितीच्या चेअरमनपदाच्या निवडीचे वेध लागले आहेत. पुढील महिन्यात ही निवडणूक होणार असून नव्याने निवडलेल्या १६ सदस्यांपैकी कुणाकडे चेअरमनपदाची धुरा जाणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

२० फेब्रुवारीच्या सर्वसाधारण सभेत स्थायी समिती सदस्यांची निवड झाली. एकूण १६ सदस्यांपैकी भारतीय जनता पक्षाचे १४, तर एमआयएम व शिवसेना यांचे प्रत्येकी एक सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे चेअरमनपद भाजपच्या गोटातच राहणार हे निश्चित मानले जात आहे.

**मतदारसंघीय समीकरणांचा प्रभाव?**

महापौर विनायक कोंडयाल हे शहर मध्य मतदारसंघातून, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर या सोलापूर दक्षिणमधून, तर सभागृहनेते नरेंद्र काळे हेही सोलापूर दक्षिणमधून निवडून आले आहेत. त्यामुळे स्थायी समितीचे चेअरमनपद शहर उत्तर किंवा शहर मध्यकडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्यावेळी सत्तावाटपात शहर उत्तरला महत्त्वाची तीन पदे मिळाली होती. त्यावेळी संख्याबळ जास्त असल्याने हा वाटा मिळाला होता. यावेळी मात्र शहर मध्यचे नगरसेवक संख्येने अधिक असल्याने तोच निकष लावला गेला तर चेअरमनपद शहर मध्यकडे जाण्याची शक्यता



नाकारता येत नाही.

इच्छुकांची नावे चर्चेत, भाजपच्या १४ सदस्यांमध्ये अविनाश पाटील, सतीश सिरसीला, रंजिता चाकोते, गणेश वानकर, भारतसिंग बडूवाले, सत्यनारायण गुर्रम, अश्विनी चव्हाण, संगीता जाधव, जयकुमार माने, शिवाजी वाघमोडे, कल्पना कदम, राजकुमार पाटील, अमर पुदाले आदींची नावे आहेत. यापैकी कोणाला संधी मिळणार याबाबत उत्सुकता आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी आमदार दिलीप माने यांची जवळीक लक्षात घेता गणेश वानकर किंवा जयकुमार माने यांच्या नावाचा विचार झाल्यास आश्चर्य वाटू नये, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

चाकोते, वानकर, माने चर्चेत, बाहेरच्या पक्षातून आलेल्यांना पद देऊ नये, असा एक मतप्रवाह असला तरी तो निकष शिथिल होऊ शकतो. महापौर स्वतः अलीकडेच पक्षांतर करून भाजपमध्ये आलेले असल्याने रंजिता चाकोते, गणेश वानकर व जयकुमार माने यांच्या नावांची जोरदार चर्चा सुरू आहे.

सोशल इंजिनीअरिंगचा फॉम्युर्ला,चेअरमन निवडताना समाजनिहाय प्रतिनिधित्वाचाही विचार होऊ शकतो. ओबीसी व मराठा समाजाला पदे मिळाल्यानंतर लिंगायत समाजाला संधी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर रंजिता चाकोते, अविनाश पाटील, राजकुमार पाटील, अमर पुदाले आदींची नावे पुढे येत आहेत.

निवडणुकीची तारीख लवकरच, स्थायी समितीच्या चेअरमनपदाची निवडणूक घेण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांकडे आहेत. महापालिकेकडून प्रस्ताव पाठवण्यात आला असून पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकीची तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे. ३१ मार्चपूर्वी महापालिकेचा अर्थसंकल्प मंजूर करणे आवश्यक असल्याने ही निवड लवकर होणार, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# श्री विठ्ठल शिक्षण व ज्ञानपीठ संस्थेचे एनएमएमएस परीक्षेत उज्ज्वल यश

**माढा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत 28 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती अर्थात एनएमएमएस या इयत्ता 8 वी करिता घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत माढा तालुक्यातील निमगाव (टें) येथील श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ व श्री विठ्ठल ज्ञानपीठ या दोन्ही संस्थांच्या अनुक्रमे उपळाई खुर्द व आनंदनगर–मानेगाव शाखांमधील एकूण 16 विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादित केले आहे त्याबद्दल त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



उपळाई खुर्दच्या न्यू इंग्लिश स्कूलमधील यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये नरेंद्र श्रीधर गोरे–142 गुण,वैष्णवी तानाजी राऊत–113 गुण,प्रतीक्षा अजिनाथ राऊत–101गुण, श्रावणी धनाजी हराळे–100 गुण,सायली दिनेश केदार –87 गुण, सार्थक बालाजी यादव –80 गुण,संकेत सोमनाथ जाधव–78 गुण, सुप्रिया उद्धव बंडगर–76 गुण, गौरी भाऊ हराळे–76 गुण,समर्थ आप्पासाहेब बोराडे–76 गुण व तेजू दत्तात्रय जाधव–73 गुण यांचा समावेश आहे.

आनंदनगर–मानेगाव येथील श्री संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये श्रुती लक्ष्मण घोगरे–89 गुण, स्नेहा अण्णासाहेब खोत–80 गुण, अस्मिता विनोद लटके–79 गुण, आरती योगेश पवार–75 गुण, हर्षद हनुमंत खोत–74 गुण यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक हनुमंत खापरे, तुकाराम कापसे, लहू लोंढे, छाया राऊत, आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड,महेश नागटिळक, प्रविण लटके, तनुजा तांबोळी, त्रिशला साळुंखे, स्वाती पाटोळे व गजानन साठे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे,चेअरमन विक्रमसिंह शिंदे, व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे, सरपंच संदीप पाटील, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, केंद्रप्रमुख रमाकांत पवार, केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांच्यासह ग्रामस्थ व शिक्षकांनी केले आहे.

# 'पहाट' उपक्रमांतर्गत जात प्रमाणपत्र वितरण व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मा. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कुडूर्वाडी पोलीस स्टेशनच्या वतीने दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी 'पहाट' उपक्रमांतर्गत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पारधी समाजाच्या नागरिकांना जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले या प्रसंगी उपस्थित नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यात आली.

तसेच भेंड येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित मान्यवर आणि नागरिकांच्या हस्ते विविध प्रकारची रोपे लावण्यात आली. 'पहाट' उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, पर्यावरण संरक्षण व शासकीय योजनांची जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमास पोलीस अधीक्षक मा.अतुल कुलकर्णी,सहापोलीस अधीक्षक अंजना कृष्णा व्ही एस मॅडम तसेच अतुल मोहिते, पोलीस निरीक्षक, कुडूर्वाडी पोलीस ठाणे व नायब तहसीलदार, ठोंबरे व भडकवाड, माढा तहसील कार्यालय, आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी, सरतापे तसेच प्रथम एज्युकेशन फाउंडेशन चे अध्यक्ष दिपक शिरोळे, स्थानिक ग्रामस्थ, पोलीस कर्मचारी मोठ्या संख्ये उपस्थित होते.

# नातेपुते नगर पंचायतीकडून वसूली मोहीम, थकीत रकमेवर दोन टक्के आकारणी - मुख्याधिकारी शिंगाडे

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते नगर पंचायतीच्या हद्दीतील मालमत्ता धारकांकडून आर्थिक वर्ष २०२५-२६ चा मालमता कर, गाळे भाडे तसेच पाणीपट्टीच्या वसुलीची विशेष मोहीम राबवण्यात येत आसुन थकीत मागणीच्या रकमेवर दरमहा दोन टक्के रकमेची आकारणी करण्यात येणार असल्याची माहिती नातेपुते नगरपंचायतचे मुख्याधिकारी विकास शिंगाडे यांनी दिली आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ नुसार मालमता धारकांनी थकीत व चालू मालमत्ता कर, गाळे भाडे व पाणीपट्टी यांची संपूर्ण रक्कम भरणे आवश्यक आहे. जे मालमत्ताधारक विहित मुदतीत या रकमांचा भरणा करणार नाहीत अशांच्या थकीत मागणीच्या रकमेवर दरमहा दोन टक्के व्याजाचे आकारणी करण्यात येणार आहे.व्याज आकारणी टाळण्यासाठी मालमत्ता धारकांनी



आपल्याकडील थकीत मालमत्ता कर, गाळा भाडे पाणीपट्टी नगर पंचायतीच्या कार्यालयात तत्काळ भरावेत अन्यथा मालमत्ता सील करणे, गाळा सील करून नगर पंचायतीच्या ताब्यात घेणे, पाणीपुरवठा नळ कनेक्शन बंद करणे, मालमत्ता धारकांची नावे शहरातील प्रमुख चौकाचौकात प्रसिद्ध करणे यांसारखी कारवाई करण्याचे नियोजन नातेपुते नगरपंचायतीने केले आहे. त्यानुसार १ मार्च २०२६ पासून थकबाकी दारांचे नळ कनेक्शन कट करण्याची कारवाई पाणीपट्टी विभागाकडून करण्यात येणार आहे. तरी सर्व मालमत्ता धारकांनी ही कठोर कारवाई टाळण्यासाठी थकीत व चालू रकमांचा तत्काळ नगरपंचायतीच्या कार्यालयात भरणा करून नगरपंचायतीस सहकार्य करावे असे आवाहन नातेपुते नगर पंचायतीच्या वतीने नातेपुते शहरातील नागरिकांना नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी विकास शिंगाडे यांनी केले आहे.

# अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान
## पंचनामे जलद करण्याच्या सूचना

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** गेल्या दोन दिवसांतील वादळी वारे व अवकाळी पावसामुळे ज्वारी, हरभरा, गहू तसेच द्राक्ष, आंबा आणि चिंच उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शी येथे संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरपाई मिळावी यासाठी प्रशासनाने जलद गतीने कार्यवाही करावी, असे त्यांनी



स्पष्ट केले. कोणत्याही शेतकऱ्याने काळजी करू नये; नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी शासन दरबारी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

**कांद्याचे दर कोसळले; ५ रुपये प्रति किलो अनुदानाची मागणी**

दरम्यान, काही दिवसांत कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. ३,००० रुपये प्रति क्विंटल असलेला कांद्याचा दर सध्या ४०० ते ८०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी प्रति किलो ५ रुपये अनुदान देण्याची मागणी देवेंद्र फडणवीस व पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांची लवकरच भेट घेण्याचे नियोजन असल्याची माहिती राजेंद्र राऊत यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

# जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या शालेय समितीचे पुनर्गठन



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव तालुक्यातील तडवळे येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या शालेय समितीची निवड करण्यात आली या मध्ये नूतन अध्यक्ष पदी रियाज तांबोळी तर उपाध्यक्ष सौ समीना वाशिम शेख यांची निवड झाली.तसेच सदस्य पदी असलम शेख.फरीद कोतवाल.निसार मुजावर,जावेद मुजावर यांची निवड करण्यात आली.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले तडवळा गावचे उपसरपंच हरून शेख यांनी नियुक्त अधिकाऱ्याचे सत्कार करून अभिनंदन केले. कार्यक्रमास विशाल जमाले,असलम शेख,निसार मुजावर,फरीद,कोतवाल.सामाजिक कार्यकर्ते मुश्रीफ मुजावर,आदम मुजावर, शरीफ तांबोळी, मुराद शेख, वाहिद शेख,अमर सय्यद,अमजद फकीर,वाशिम शेख, शाळेचे मुख्याध्यापक शमीम बेगम व शिक्षक कर्मचारी,पालक उपस्थित होते.

# सोनी नगर येथे नूतन 'आरोग्यवर्धिनी केंद्र' सुरू
## हजारो नागरिकांना दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ मधील नागरिकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने मोठी आणि दिलासादायक ठरला आहे. सोनी नगर येथे नूतन 'आरोग्यवर्धिनी केंद्र' उभारण्यात आले असून परिसरातील हजारो नागरिकांना याचा थेट लाभ होणार आहे. या केंद्रासाठी प्रभागातील भाजपा नगरसेवक किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, सौ. अंबिका नागेश अण्णा गायकवाड व सौ. चैत्रालीताई शिवराज गायकवाड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आणि प्रशासनाच्या सहकार्याने हे केंद्र साकार झाले. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त लोकरे साहेब व आरोग्य अधिकारी राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राची उभारणी पूर्ण झाली. या केंद्रामुळे सोनी नगर हडको, लहान इरण्णा वस्ती, मोठी इरण्णा वस्ती, रेवणसिद्धेश्वर



नगर झोपडपट्टी, आम्रपाली चौक परिसरातील नागरिकांना आर्थिक आणि आरोग्यदृष्ट्या मोठा फायदा होणार आहे. उद्घाटनानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची तपासणी करून मोफत औषधोपचार देण्यात आले. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज असलेले हे केंद्र कष्टकरी कामगारांसाठी वरदान ठरणार असल्याचे नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले. तसेच या उपक्रमासाठी पालकमंत्री गोरे आणि आमदार कोठे यांचे त्यांनी विशेष आभार मानले. प्रभाग २२ मध्ये आरोग्यसेवेचा हा नवा अध्याय ठरून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या आरोग्य शिबिराप्रसंगी डॉ. म्हेत्रे, प्राजक्ता काकडे, रुपेश गायकवाड, संतोष माने, इस्माईल मनुरे, मल्लिकार्जुन बेनावत, अविनाश गवळी, उमेश चलवादी,प्रीती गायकवाड आदी आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांच्यासह नागेश ढेंगळे, संतोष गायकवाड, हरीश तेलगू, विकी सगटे, सिद्राम माडेकर, येलगुंडे मावशी, वसंत पवार आदींची उपस्थिती होती. या आरोग्य शिबिरास परिसरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

# उपमहापौर देवकर यांच्या तत्परतेमुळे भुईकोट किल्ल्यातील आग आटोक्यात

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** बुधवारी दि. 25 फेब्रुवारी सायंकाळी सुमारे सातच्या दरम्यान शहराच्या मध्यभागी असलेल्या ऐतिहासिक भुईकोट किल्ला परिसरातील खंदक बागेत अचानक आग लागल्याची घटना घडली. आगीचे प्रचंड गोळे बाहेर दिसत असल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

या घटनेची माहिती एका सजग नागरिकाने तात्काळ सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांना दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी विलंब न लावता अग्निशामक अधिकारी साळुंके यांच्याशी संपर्क साधत अग्निशामक दलाची गाडी त्वरित घटनास्थळी रवाना केली. अग्निशामक दलाच्या तत्पर कार्यवाहीमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले.

घटनास्थळी उपमहापौर देवकर यांनी स्वतः भेट देऊन




पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक उपाययोजनांच्या सूचना दिल्या. पुरातत्व विभाग, महापालिका, पोलीस प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून भुईकोट किल्ला व बागेच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र बैठक घेऊन ठोस उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या आगीत काही प्रमाणात वृक्षांना फटका बसला असला तरी मोठी हानी टळली आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत चौकशी सुरू आहे. काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही तरुण किल्ल्याच्या पळवाटेतून आत प्रवेश करून अंमली पदार्थांचे सेवन करतात, त्यामुळे आग लागली असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

या प्रसंगी सुरक्षा कर्मचारी, पुरातत्व विभागाचे अधिकारी, महापालिका कर्मचारी, महानगरपालिका अग्निशामक दलाचे जवान तसेच उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर उपस्थित होते.

उपमहापौर देवकर यांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# शाळा सकाळ सत्रात भरवा; प्राथमिक शाळा संयुक्त कृती समितिची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर व जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळा मार्चपासुन सकाळ सत्रात भरवा.अशा मागणीचे निवेदन खाजगी प्राथमिक शाळा संयुक्त कृती समितीच्यावतीने प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना दिल्याची माहीती डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली. डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद,युवक शिक्षक कर्मचारी संघटना,महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेच्या संयुक्त कृती समितीच्यावतीने हे निवेदन देण्यात आले.या निवेदनावर आप्पाराव इटेकर,विनोद आगलावे,वल्लभ चौगुले व अ.गफुर अरब यांच्या सह्या आहेत.सध्या उन्हाळा चालु असुन तापमान ३८ अंश सेल्सियसच्या आसपास आहे.उन्हाची तीव्रता वाढत आहे.सोलापुर शहराला पाच दिवसाआड एकदा पाणीपुरवठा होतो.त्यामुळे अनेक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते.हद्दवाढ भागामध्ये व ग्रामीण भागात ही समस्या प्रकषार्ने जाणवते.त्यातच रमजानचा महिना सुरु असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे उपवास (रोजे) असतात.वाढत्या तापमानाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पिण्याच्या पाण्याची समस्या व वाढते तापमान याचा विचार करुन शाळा सकाळ सत्रात भरविण्यात याव्यात. असे निवेदनात म्हंटले आहे.शालेय समितीच्या सभेमध्ये या विषयावर चर्चा करुन योग्य निर्णय घेतला जाईल.असे आश्वासन प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी शिष्टमंडळाला दिले.या शिष्टमंडळात बरगली लांडगे, राजेंद कुंभार,मल्लिकार्जुन बगले,सागर स्वामी,नवनाथ भोसले आदी उपस्थित होते.

# स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी प्रा डॉ बापूसाहेब आडसूळ यांची बिनविरोध निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, भावी शिक्षक आमदार आरोग्य दूत मंगेश चिवटे यांच्या संकल्पनेतून शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्र असणारी स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली या पतसंस्थेच्या चेअरमनपदी एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष, पुणे बोर्ड सदस्य, सदस्य मंत्रालय समन्वय



समिती मुंबई प्रा डॉ बापूसाहेब आडसुळ यांची सर्व संचालक यांच्या मीटिंगमध्ये बिनविरोध चेअरमनपदी निवड करण्यात आली तर व्हा चेअरमनपदी प्रदेश सचिव प्रा गंगाधर पडणूरे यांची निवड करण्यात आली प्रसंगी सर्व संचालक मंडळ व शिक्षक सेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते यावेळी चेअरमन व्हा चेअरमन यांचा सत्कार सर्व संचालक मंडळ आणि डी डी आर ऑफिसचे जुजगार साहेब यांच्या शुभहस्ते सत्कार करून शुभेच्छा दिल्या या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा बरोबर राज्यामध्ये शुभेच्छांचा वर्षाव होत आहे या निवडीबद्दल राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# रमजानमध्ये व्यवसायाला रात्री १ वाजेपर्यंत परवानगी द्यावी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या पवित्र रमजान महिना सुरू असून या काळात मुस्लिम बांधव दिवसभर उपवास पाळतात. सायंकाळी इफ्तारच्या वेळी तसेच रात्री उशिरापर्यंत बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ वाढत असल्याने सोलापूर शहरातील दुकाने, स्टॉल्स, हॉटेल्स व इतर व्यावसायिक आस्थापनांना रमजान महिन्यात रात्री १ वाजेपर्यंत व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी एमआयएमच्या नगरसेवकांनी पोलीस आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, इफ्तारच्या वेळी नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येत असल्यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी तसेच शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने आवश्यक ती सवलत व सहकार्य द्यावे.

तसेच इफ्तार आणि सायंकाळच्या नमाजवेळी नागरिकांना सूचना देण्यासाठी मशिदींमधून किंवा निश्चित ठिकाणी केवळ दहा मिनिटांसाठी लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

रमजान महिन्यातील धार्मिक भावना, वाढती गर्दी आणि व्यापाऱ्यांचे आर्थिक हित लक्षात घेऊन प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नगरसेवकांनी व्यक्त केली आहे.

# नातेपुते बस स्थानक नूतनीकरण करण्याची पालक मंत्र्याकडे मागणी

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील बसस्थानकाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर अक्षय भांड यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची मुंबई येथे भेट घेतली. बसस्थानकाच्या दयनीय अवस्थेकडे पालकमंत्र्यांचे लक्ष वेधत त्यांनी या विषयावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.नातेपुते हे जिल्ह्याचे एक प्रमुख व्यापारी केंद्र आहे. मात्र, येथील बसस्थानकाची इमारत धोकादायक झाली असून, अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे स्थानिक नागरिक, विद्यार्थी, रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेषतः महिला आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बसस्थानकाची इमारत जीर्ण झाली असून, ती प्रवाशांसाठी असुरक्षित आहे. यामुळे प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे.पुरेशा सोयी-सुविधा नसल्यामुळे महिला व विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. नातेपुते बसस्थानकाच्या नूतनीकरणाच्या घोषणा आतापर्यंत झाल्या आहेत, केवळ पालकमंत्री जयकुमार गोरे हे जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी ओळखले जातात. ते नातेपुतेकरांना लवकरच अत्याधुनिक सोयीयुक्त बसस्थानक मिळवून देतील, असे अक्षय भांड यांनी यावेळी सांगितले.